# घरीच मूर्ती विसर्जनावर भर

First Published :24-August-2016 : 06:14:20

Share 0 Tweet G+1 0



पुणे : पर्यावरणाच्या दृष्टीने गणेशमूर्तीचे घरच्या घरी विसर्जन करण्यासाठी आता महापालिकेच्या वतीने प्रोत्साहन देण्यात येणार आहे. महापौर प्रशांत जगताप यांनी गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी आयोजिलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. गणेशोत्सवात कोणत्याही कारणाने गणेशभक्तांची अडचण होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेण्याच्या सूचना महापौरांनी या वेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

अतिरिक्त आयुक्त राजेंद्र जगताप तसेच आरोग्य, बांधकाम, विद्युत, आकाशचिन्ह व अन्य विभागांचे प्रमुख तसेच चारही विभागांचे सहायक आयुक्त या बैठकीला उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या आधी सर्व भागातील रस्त्यांची दुरुस्ती, सार्वजनिक स्वच्छतागृहे मोफत उपलब्ध करणे, रस्त्यांची, स्वच्छतागृहांची साफसफाई, विशेषत: साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी सर्वत्र औषध फवारणी करण्याच्या सूचना महापौरांनी केल्या. उत्सवकाळात शहरात कुठेही अंधार राहणार नाही, सर्व पथदिवे सुरु असतील, याची काळजी घेण्यास त्यांनी पथ, तसेच विद्युत विभाग यांना सांगितले. आरोग्य विभागाने डॉक्टर्ससह वैद्यकीय पथके, प्राथमिक उपचाराची साधने तसेच वाहनही उपलब्ध करून ठेवण्याबाबत त्यांनी सांगितले.

>नदीमध्ये मूर्ती विसर्जन केले तर नदीची हानी होत असल्याने मागील काही वर्षांपासून घरगुती गणेशमूर्तीचे घरीच विसर्जन करावे, अशी चळवळ सुरु आहे. तसेच नदीजवळही पालिकेच्या वतीने त्यासाठी खास हौद तयार करून देण्यात येतात. या वेळी घरगुती विसर्जन वाढावे, यासाठी असे विसर्जन करु इच्छिणाऱ्या नागरिकांना पालिकेच्या वतीने एका बॅगमध्ये अमोनियम बायकार्बोनेट उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ही पावडर बादलीभर पाण्यात टाकल्यानंतर प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्तीसुद्धा ४८ तासांमध्ये पूर्ण विरघळून जाणार आहे. पालिकेने यासाठी १० टन अमोनियम बायकार्बोनेटचा साठा करून ठेवला आहे.

**Your Comments**

Name

**Name** Ramdas talape

khup chukicha sandesh jato ahe.

**Name** वासनिक

मूर्ती विरघळविण्या साठी अमोनियम बायकार्बोनेट ची कल्पना चांगली आहे मूर्ती/निर्माल्य ह्या पेक्षा नदी पात्रात टाकला जाणारा राडा रोडा ह्या कडे लक्ष द्यावे. मैला/सांडपाणी नदी पात्रात सोडले जाणार नाही ह्या कडे लक्ष द्यावे

**Name** महेश

:) असा नसत करायच. मग गणपतीच नका बसवू काही माहीत नसेल तर.

रिओ ऑलिंपिक्स 2016

महत्वाच्या बातम्या

- जीएसटीविरोधात ठाकरे बंधू एकवटले
- आवश्यक तिथे अॅट्रॉसिटीमध्ये दुरुस्ती करावी लागेल- शरद पवार
- मुंबईत रिक्षा-टॅक्सी चालक मध्यरात्रीपासून जाणार संपावर
- '100 जणांच्या व्हॉट्स अॅप ग्रुपला प्रतिबंध', हे होतं विडंबन
- जादूटोण्याच्या संशयावरून दाम्पत्याची निर्घृण हत्या
- शिरूरच्या नगरसेवकाचा निर्घृण खून
- भारताने विंडीजला १४३ धावांत गुंडाळले
- धनगर आरक्षणासंदर्भात जनहित याचिका
- २ सप्टेंबरला शाळा, महाविद्यालये बंद
- VIDEO- कैद्यांनी चढवला कारागृहाच्या भिंतींना रंगीत साज










Copyright © 2013-2019 Lokmat Media Pvt Ltd